# बुद्धाची सामाजिक क्रांती एक अध्ययन

**डॉ. स्निग्धा एस. सदाफळे**
सहयोगी प्राध्यापिका, तथा विभागप्रमुख,
पाली व प्राकृत विभाग डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
चंद्रपूर. (महाराष्ट्र) 442 402.
snigdha210675@gmail.com Mb. 9673309784.

## सांराश-

जगात इतर समाजक्रांतीच्या तुलनेत बुद्धाने केलेली समाजक्रांती वर्णव्यवस्थापक कृषीदास प्रथेचा अंत करणारी होती.या क्रांतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असे बुद्धाचे “सामञ्ञफलसुत्त” हे सुत्त आहे.बुद्धाने समाज क्रांती केली,हे डॉ.आंबेडकरांशिवाय कोणाच्याही लक्षात आले नाही,” डॉक्टर बी आर आंबेडकर राष्ट्रीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याला समाज क्रांतीच्या परिभाषेत जातिव्यवस्थान्तक भांडवलदारी लोकशाही क्रांतीला जास्त महत्त्व देत होते”(1) म्हणून जगात आंबेडकरांशिवाय इतर कोणीही बुद्धापर्यंत पोहोचू शकले नाहीत.

*बीजशब्द- बुध्द, समाज क्रांती, गण समाज, वर्ण व्यवस्था, सामंत प्रथा, जात्यन्तक, भांडवलदारी, लोकशाही*

## प्रस्तावना-

बुद्धाने केलेली क्रांती ही अध्यात्मिक नसून सामाजिक आहे, हे कोणीही समजून घेतलेले नाही. त्याकरिता त्याने,अशा पद्धतीने त्याचा संघ निर्माण करून,कार्यान्वित केला. याचे चिकित्सक दृष्टीने,सूक्ष्म अध्ययन गरजेचे आहे.सोबतच बुद्धकालीन दर्शनीक,सामाजिक राजकीय व आर्थिक क्षेत्राचा सखोल अभ्यास देखील हवा.याशिवाय स्त्रीसत्ताक इतिहासाचा ही यथायोग्य अभ्यास हवा. त्याशिवाय बुद्धांनी केलेली सामाजिक क्रांती न समजल्यामुळे तिला अपंगत्व येण्याची दाट शक्यता आहे “समाज क्रांती विचारसरणी विरुद्ध होत नाही ती अवरोधक बनलेल्या समाज व्यवस्थेविरुद्ध होत असते” (2).

गौतम बुद्धाने गृहत्याग करण्याचे ऐतिहासिक सत्य व ज्याकरिता त्याने नवीन समाजाची संकल्पना कार्यान्वित करण्याची ठरविले ते,स्वनिर्मित भिक्खु भिक्खुनी संघ व त्यांच्याद्वारे समाजक्रांतीसाठी लागणारी आखीव कार्यक्रम पत्रिका त्याने संबोधी प्राप्ती नंतर अमलात आणली. बुद्धाने वर्ण व्यवस्थापक- दासप्रथांन्तक समाज क्रांतीची बीजे रुजवलीत.यासाठी त्याने या क्रांतीच्या पंचधम्माचा कार्यक्रम बनविला, नुसता कार्यक्रम बनविला नाही तर तो सक्षमपणे कसा राबवावा याचे साठी भिक्खु भिक्खुनींच्या मार्फत अमलात आणला. कोणतीही क्रांती ही हिंसा केले शिवाय होणे शक्य नाही. या जनमानस दृढ विचाराला, बुद्धाने तडा दिला.त्याने ती सामाजिक क्रांती कशी रक्तपाता शिवाय केली हे समजून घेण्यासाठी ती तिपिटकातील सुत्तपटकातील “सुत्तनिपात “या ग्रंथातील “कसिभारद्वाजसुत्त”(3) अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजाविते.

कसिभारद्वाज सुत्ताच्या आधारे तत्कालीन भौगोलिक व सामाजिक स्थितीचा आपण विचार केला तर असे लक्षात येते,कसिभारद्वाज हा ब्राह्मण असून तो पुरोहित्य हे काम न करता जंगलाची कटाई सफाई करून त्या जमिनीवर उदरनिर्वाहासाठी शेती व्यवसाय करतो आहे." एकनाळा नामक ब्राह्मणगाव दक्षिणगिरी सुभ्यातील होते. जेथे कृषी भारद्वाजाचे शेतीचे काम सुरू होते".(4) दक्षिणगीरी हा मगधाचा भाग आहे,मगध हे सामंतप्रथाकराज्य. त्यावेळी त्याचा प्रमुख हा बिंबिसार राजा होता. मगधातील दक्षिणगीरी प्रांतात ब्राह्मणांचे अनेक गाव दिसतात. वर्णानुसार गावांची रचना त्यावेळी तिपिटकात अनेक सुत्तातून सिद्ध करता येते. जसे एकनाला ब्राह्मणगाव हेही दक्षिणगीरीत दिसून येते.तेथील ब्राह्मण हे पौरोहित्य करून त्यांचे उदर पोषण करीत होते. मात्र कसिभारद्वाज हा ब्राह्मण निकृष्ट असे शेती करताना दिसतोय. "कसिभारद्वाजस्स ब्राह्मणस्स पञ्चमत्तानि नङ्गलसत्तानि पयुञ्जानि होन्ति वप्पकाले"(5) .

या एकनाला ब्राह्मण गावात इतर ब्राह्मण हे वैदिक पौरोहित्य करीत तर अग्निभारद्वाज हा शेतीचे तुच्छ कर्म करीत असल्यामुळे त्याचे नावच कसिभारद्वाज तुच्छतेने पडलेले असावे,असे लक्षात येते.त्याचप्रमाणे एकाच वेळी शेतात तो 500 औते चालविताना दिसतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात शेती एकट्याने करणे शक्य नाही किंवा कुटुंब व आप्तेगणांना घेऊन सुद्धा करणे शक्य नाही म्हणजेच त्याच्या शेतात काम करणारे मोठ्या संख्येने जी लोक दिसतात, ती सर्वच मजूर आहेत किंवा कृषी दास असावे हे सिद्ध होते.एवढ्या छोट्या भागात 500 औत चालवणे व त्यासाठी लागणारे लोक हे निश्चितच त्याच्याच गावातील असतील हे शक्य नाही, म्हणूनच ते दास होते हे देखील सिद्ध होते. मगध हा गणराज्याचा वा संघराज्याचा अविज्य भाग नसल्यामुळे तो अगणी ठरतो. असा अगणी मगध प्रांत हा राजेशाहीने चालत असला तरी तो सामंतक प्रांत आहे हे सिद्ध होते.अशा अगणी सामंत प्रथाक मगध राज्यात दास प्रथा होती.हे "कसिभारद्वाज सुत्तातून"(6) सिद्ध होते. हा कसिभारद्वाज बुद्धाच्या शेतीविषयक विचार जाणून उपासक झाला.

" क्रांतिकारी तत्त्वज्ञानसमाजक्रांतसाठीच उदयाला येत असते. बुद्धाने तत्वज्ञानात क्रांती केली, समाजात नाही". असे देवी प्रसाद चट्टोपाध्याय "लोकायत"(7) या ग्रंथात म्हणतात. ते बुद्धाने अगदी साफखोटे ठरविले. बुध्दाने संबोधी प्राप्तीनंतर तत्कालीन प्रचलित तत्त्वज्ञानाविरोधी स्वतःच्या तत्त्वज्ञानाचा पर्याय उभा केला व तो राबविला.भिक्खु-भिक्खुणि संघाच्या मार्फत, त्याचे तत्त्वज्ञान चातुवर्णधर्म व संसाराच्या पार नेणाऱ्या सहा श्रमनांच्या तत्त्वज्ञानाशी संघर्ष करणारे होते. त्याच्या नवीन तत्त्वज्ञानाची बैठक सामाजिक क्रांतीची बीज रोपण करणारे होते.याकरिता त्याने वयाच्या 46 व्या वर्षी समाज क्रांतीसाठी एक कार्यक्रम आखला़. तोच पंचधम्म कार्यक्रम त्याने आयुष्यभर राबविला. जेव्हा तो 76 वर्षाचा झाला. त्यावेळी त्याला राजा अजातसत्तुने श्रामण्याचे "याची देही याची जन्मी"(8) काय फळ असा प्रश्न केला? त्यावेळी अक्रियवादी पूरणकस्सप, नियतीवादी मक्खाली घोसाल, उच्छेदवादी अजित केस कम्बल,अकृततावादी पकुध कच्चायनआणि चातुर्यामसंवरवादी निगण्ठनाथ, यांना त्याच्या प्रश्नाचे यथायोग्य उत्तर देता आले नाही.ते फक्त स्वतःचे तत्त्वज्ञान सांगून मोकळे झालेत.परंतु राजा

अजातसत्तुचे समाजाच्या हितासाठी फलनिष्पत्ती बाबत त्याचे कुतूहल किती तीव्र व व्यवहारी होते हे लक्षात घेतले पाहिजे.

या 'सामञ्ञफलसूत्ता' चे वैशिष्ट्य असे की बुद्ध या प्रश्नाचे प्रति प्रश्न स्वरूपात स्पष्टीकरणात्मक उत्तरे देतात ही उत्तरे देताना राजा अजातसत्तुने श्रामणयाचे फल विचारले असता, त्याला कृषी दासाचे उदाहरण न देता तो गृहदासाचे उदाहरण देतो. यावरून बुद्ध उत्तरे देताना, व्यक्तिगत आव्हानांचे तंत्र वापरतो. राजाशी संबंधित प्रश्न असल्यामुळे तो त्याच्याच दासांचे उदाहरण देऊन त्या प्रश्नाचे निरासन करतो. राजाचा दास, हा राजाचे न सांगता त्याची सर्व कामे करतो, तो राजा उठण्यापूर्वी उठून कामे करतो, राजा झोपी गेल्यानंतर झोपतो. त्याचे हे वर्तन राजाला प्रिय आहे त्याची भाषा देखील आज्ञाकारी आहे अशा दासाच्या मनात जर असे आले की, मी मनुष्य आहे. राजा ही मनुष्य आहे. राजाच्या पूर्वकर्माच्या फळामुळे तो हे सुख अनुभवतो आहे. मग मी का दाढी मिशी केस कर्तन करून काषायवस्त्र धारण करून प्रवचित होऊन पुण्य कमवू नये. असा विचार करून जर का तो दास प्रवचित झाला, तर तुम्ही काय त्याला पकडून शिक्षा करणार?असा प्रश्न विचारतात राजा अजातसत्तु प्रतिप्रश्न आणि उत्तर देतो. 'नाही मी त्याचा मानसन्मान करणार,सेवाकरणार,आसन देणार,भिक्षा,शयनआसन, औषध पाणी देणार, निमंत्रण देऊन, आदर सत्कार करणार',त्यावर बुद्ध उद्गारले की' "हे याच देही याच जन्मी सामञ्ञाचे फळ आहे". असे तुला वाटत नाही का! (9)

तथागताने येथे कृषी दासाची वा गहपती दासाची उदाहरण राजा अजातसत्तुला न देता गृहदासाचे उदाहरण दिले आहे.बुद्ध समकालीन सामाजिक परिस्थितीचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा असे लक्षात येते की, तो काळ अराजक गणराज्याच्या ऱ्हासांचा तर अगणक सामंतप्रथाक उदयाचा कालखंड आहे. या संघगनणाला जिंकून राजेशाही समृद्ध होण्याच्या काळात सामाजिक स्थितीत बराच फरक पडताना दिसतो. गणराज्यात शेती हा व्यवसाय फक्त क्षत्रिय गहपतीच करायचे, इतरांना शेती व्यवसाय करण्याचा अधिकार नव्हता. यावरून देखील संघगणात फक्त दोन वर्ण होते हे सिद्ध होते.ते म्हणजे क्षत्रिय व दास कर्मकार. त्या वर्णव्यवस्थेतील ब्राह्मण वैश्य शूद्र ही वर्ण निर्मिती प्रक्रियेला सुरुवात झालेली होती. परंतु जसजसे राजकीय परिस्थिती व सामाजिक परिस्थितीत बदल होत गेला वर्ण व्यवस्थित इतर तीन वर्ण गरजेनुसार पक्के होत गेले.त्यांचे सामाजिक वर्चस्व अधिकाधिक दृढ होतगेले.राजेशाहीतील वर्ण हे सामाजिक चौकट असे प्रसूत झाले. संघगणात जमीन ही संपूर्ण गणाच्या मालकीची होती. कोणा एकाचा अधिकार नव्हता तर राजेशाहीत जमीन ही क्षत्रिय गहपतींची होती. त्यावर गणाचा अधिकार नव्हता. अत्यंत मार्मिक उदाहरण शरद पाटील त्यांच्या 'जात्यान्तक भांडवलशाही लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पुर्ती' या ग्रंथात करतात. मगध राज्यातील "महाविद्यांचा ब्राह्मणग्रहपती महाकश्यप प्रवज्जित होतो आणि आपले 14 दास गणे मुक्त करतो. पण शाक्य राजा भद्दीय, अनिरुद्ध, आनंद, भृगु, किंबली व देवदत्त हे शाक्यपुत्र प्रवज्जित होतात.त्यांच्या आभूषणापासून मुक्त

होतात.पण ते कृषी दासापासून वा दास कर्मापासून मुक्त होताना दिसत नाही. यावरून हे सिद्ध होते की संघ गणसमासात दासांची मालकी जमिनीप्रमाणेच गणाची होती".(10)

पाली तिपिटकाच्या कसिभारद्वाजसुत्ता वरून लक्षात येते की, बुद्ध हयातीत ब्राह्मण गहपती देखील शेती व्यवसाय करीत होते. फक्त क्षत्रिय गहपतींचाच तो व्यवसाय राहिलेला नसून, आता ब्राह्मण देखील शेती व्यवसाय करतोय,हे लक्षात घेतले पाहिजे.दासकर्मकाराचे विघटन होऊन वर्णातून जातीकडे प्रवास सुरू झाला होता. कृषिदास निर्माण होऊ लागले होते, हे लक्षात येते. हे सामाजिक परिवर्तन कोणत्याही सामाजिक क्रांती शिवाय समाजात घडून येत नाही. तर बुद्धाने जी सामाजिक क्रांती केली ती समजून घेण्यासाठी मेंढक गहपतीच्या उदाहरणातून आपल्या लक्षात येईल.मगध प्रांतातून वैशालीकडे जाताना भद्दियप्रातात मेण्डक गहपती यांच्याकडे तथागत भोजनाच्या निमित्ताने गेले. त्याला जो उपदेश त्यांनी केला त्याचाच त्यांनी पाच कलमी पञ्चधम्मी कार्यक्रम बनवून तो भिक्खु भिक्खुनी च्या मार्फत सामाजिक क्रांतीच्या बीज रुपाने पेरण्यास सुरुवात केली . बुद्धाने जी सामाजिक क्रांती केली ती वर्णव्यवस्थेच्या विरोधात. त्याने आपली यंत्रणा निर्माण केली. सोबतच अगणी सामंतक प्रांतात त्याने आर्थिक सुधारणेच्या बळावर दासप्रथेच्या अंतसाठी कार्यक्रम आखला. याचाच अर्थ असा होतो की, बुद्ध एकाच वेळी दोन आघाडीची लढाई लढवीत होते. एकीकडे वर्ण व्यवस्थेवर आघात तर दुसरीकडे दास मुक्तीचा कार्यक्रम.

वर्णव्यवस्था दास प्रथेचा अंत करण्यासाठी पञ्चधम्मी कार्यक्रम त्याने चालविला. त्यात मेंढक गहपतीला दिलेला उपदेश याचा अंगीकार केल्यामुळे त्याचे उत्पन्न एका पटीतून सरळ सरळ सात पटीने वाढले.हे आपण विनयपीटकाच्या मेंण्डकसुत्ताच्या आधारे समजून घेतले. या सुत्तात बुद्धाने मेण्डकाला सांगितले की, "दासाला वय व शारीरिक कृतीनुसार काम द्यावे". "मालक तो जे स्वतः अन्न खातो तेच अन्नदासाला द्यावे" "आजारी दासाची मालक स्वतःची करतो त्याप्रमाणे शुश्रुता करावी" "दासाला सणावाराला सुट्टी द्यावी" "दासाला वेतन द्यावे" या पाच सूत्री कलमी कार्यक्रमाच्या माध्यमातून बुद्धाने अवैतनिक दासाला वैतनिक केल्यामुळे, आर्थिक भरभराट निर्माण झाली. मेण्डक महासेट्ठीला भेटल्यानंतर बुद्धाला वर्ण व्यवस्थापक दास प्रथांत समाज क्रांतीचा ठोस मार्ग सापडला. मेण्डकाला त्याच्या कुटुंबीयांना व त्याच्या दास मुकादमाला विनयपीठाने दिव्य बल प्रदान केले.त्यामुळे हा ऐतिहासिक प्रसंग भारताचा इतिहासात बुद्धांनी केलेली महत्तम क्रांती होती असे अचूकपणे म्हणता येते, तरी याचा उलगडा नीट न झाल्याने बुद्धांनी कोणती समाज क्रांती केली हे समजू शकले नाही.

**निष्कर्ष –**

भिक्खु भिक्खुनींच्या पंच्चदधम्मी कार्यक्रमाच्या अथांग प्रयत्नांचे फळ हे मिळाले की मध्य भारतात दासमुक्तीचा बनवा पेटला. पूर्वी दासप्रथा व्यवस्थेत स्वामी वर दासासाठी फक्त एकच कर्तव्य होते. कामाच्या मोबदल्यात वेळी अवेळी मालकाच्या मर्जीने शिळेपाके अन्न द्यावे लागे. त्याला "दासकण्ण" असे म्हणत.पाली साहित्यात हा शब्द आजही सापडतो. त्यामुळे त्याच्या उत्पादन श्रमतेत वाढ झालेली नाही.त्याची सर्व श्रम हे

मालकासाठी होते.परंतु बुद्धाच्या या समाज क्रांतीमुळे मालक आता दासासाठी त्याच्या कुवतीनुसार श्रम देण्याने, श्रमाचे विभाजन झाले. योग्य मोबदला मिळू लागला. मालक दासाची शारीरिक काळजी घेऊ लागला. आपल्या अन्नातून अन्न देऊ लागला. समाजात यामुळे क्रयशक्ती वाढली. अतिरिक्त उत्पन्नामुळे व्यवसाय- व्यापार वाढला. व्यापारामुळे आर्थिक सुबत्ता आली.गृह बाजारपेठा आता वाढवून, आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण झाला.सातपट वाढलेल्या उत्पन्नामुळे व्यापार वाढला आणि अवैतनिक दास वैज्ञानिक झाला. माजी दास आता व्यापारामुळे कारागीर होउ लागला.आणि नवीन महत्तम आर्थिक सामाजिक क्रांतीला सुरुवात झाली. हीच बुद्धाची महत्तम समाजक्रांती होती.

**संदर्भ ग्रंथ**

1) जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पुर्ती खंड तीन  शरद पाटील सुगावा प्रकाशन पुणे पान नंबर 10

2) जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती शरद पाटील सुगावा प्रकाशन पुणे पान नंबर 14

3)सुत्तनिपात कसिभारद्वाजसुत्त धर्मानंद कोसंबी संगम  प्रेस धर्मानंद स्मारक ट्रस्ट मुंबई पान नंबर 25

4) सुत्तनिपात कसिभारद्वाससुत्त सूर्यकांत भगत व राजेंद्र भस्मे उत्कर्ष प्रकाशन, वर्धा पान नंबर 60

5)सुत्तनिपात कसिभारद्वाजसुत्त डॉ. भिक्षू धम्मरक्षित मोतीलाल बनारसीदास पब्लिकेशन  पान नंबर 18

6) सुत्तनिपात कसिभारद्वास सुत्त धर्मानंद कोसंबी धर्मानंद स्मारक ट्रस्ट मुंबई पान नंबर 26

7) लोकायत देवीप्रसाद चटोपाध्याय  दिल्ली पान नंबर 74

8) दीघनिकाय सामञ्ञनफलसुत्त मा.श. मोरे सुगावा प्रकाशन पान नंबर 61

9) विनयपिटक भिक्खु जगदीश कस्सप पाली पब्लिकेशन बोर्ड बिहार पान नंबर 254

10) जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पुर्ती शरद पाटील सुगावा प्रकाशन पुणे पान नंबर 151